मुंबई

# Mumbai News | शौचालयांची कमतरता, महिलांची कुचंबणाच!

*Mumbai Women Toilets Issue | प्रजा फाउंडेशनच्या अहवालातून धक्कादायक माहिती समोर, स्थिती दयनीय*



**Mumbai Women Toilets Issue**

**मुंबई :** मुंबई शहरात सार्वजनिक शौचालयांची स्थिती दयनीय असून यात महिलांसाठी अपुरी व्यवस्था असल्याने त्यांची कुचंबना सुरूच असल्याचे वास्तव प्रजा फाऊंडेशनने मंगळवारी जारी केलेल्या अहवालात मांडले आहे. यात त्यांनी 2023 सालच्या आकडेवारीनुसार महानगरांतील एकूण सार्वजनिक शौचालयांपैकी 6800 म्हणजे 69 टक्के सार्वजनिक शौचालयांमध्ये पाणी व 60 टक्के शौचालयांत वीज जोडणीच झालेली नसल्याचेही म्हटले आहे.

मुंबईतील लोकसंख्येच्या तुलनेत सार्वजनिक शौचालये कमी आहेत. स्वच्छ भारत अभियानानुसार एका शौचालयाचा वापर करणाऱ्या पुरुषांची संख्या 35 आणि स्त्रियांची संख्या 25 असायला हवी. मात्र, मुंबईत 86 पुरुष आणि आणि 81 महिला एका सार्वजनिक शौचालयाचा वापर करीत आहेत. 2023 च्या आकडेवारीनुसार दर 4 सार्वजनिक शौचालयातील केवळ एक शौचालय स्त्रियांसाठी आहे. शौचालयांचा तुटवडा असून पाणी जोडणी व वीज जोडणी नसलेल्या शौचालयांची संख्याही निम्माहून अधिक आहे. ज्या प्रभागामध्ये व्यापारी व सांस्कृतिक कारणांमुळे ये- जा करणाऱ्या रहिवाशांचे प्रमाण अधिक आहे तेथील स्थिती तर अधिक बिकट असल्याचे अहवालत म्हटले आहे.